# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**कार्यालयीन सूचना क्र. ०९/२०२३**

क्र.संगाबाअवि/१/१०२/ई-१९(एम)/३-१४१/२०२३ दिनांक : २८/०२/२०२३

**विषय : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार २०२३**

संदर्भ : विनियम क्र. १/२०२३ ( विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक/शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांना उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्याबाबतचे विनियम, २०२३)

उपरोक्त विषयाबाबत विद्यापीठाद्वारे विहित करण्यात आलेल्या संदर्भांकित विनियमाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. सदरील विनियम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in)Awards and Achivements या शिर्षका अंर्तगत उपलब्ध असून विद्यापीठातील शिक्षक /प्रथम श्रेणी अधिकारी/द्वितीय श्रेणी अधिकारी/तृतीय श्रेणी कर्मचारी/चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल तथा योगदानाबद्दल विद्यापीठाच्या वर्धापन दिनी १ मे, २०२३ रोजी पुरस्कारास पात्र ठरणाऱ्यांचा गौरव करावयाचा आहे. याकरिता खालीलप्रमाणे गटाची वर्गवारी करण्यात आली आहे.

अ) शिक्षक
ब) प्रथम श्रेणी अधिकारी
क) द्वितीय श्रेणी अधिकारी
ड) तृतीय श्रेणी कर्मचारी
इ) चतुर्थ श्रेणी कर्मचारी

विद्यापीठ आस्थापनेत सलग ५ वर्षे सेवा झालेल्या शिक्षक /अधिकारी/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उपरोक्त ५ गटांमधून प्रत्येकी दोन (एक महिलांकरीता राखीव) याप्रमाणे खालील स्वरूपाचा पुरस्कार देण्याबाबत विचार करण्यात येईल.

**१) प्रमाणपत्र २) शाल व श्रीफळ ३) १०० ग्रॅम वजनाचे चांदीचे पदक**

उपरोक्त प्रयोजनार्थ सदर उपक्रमात सहभागी होण्यास इच्छुक असणाऱ्या शिक्षक /अधिकारी/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in)Awards and Achivements या शिर्षका अंर्तगत उपलब्ध असलेला विहित प्रपत्रातील अर्जाचा नमुना प्राप्त करून आवश्यक माहिती तथा सहपत्रांसह **६ संचामध्ये** आपले विभाग प्रमुख/नियंत्रण अधिकारी यांना सादर करावा.

विभाग प्रमुखांनी/नियंत्रण अधिकाऱ्यांनी विनियमामध्ये नमुद निकषांची पुर्तता करणाऱ्या तथा गौरवाकरीता पात्र वाटणाऱ्या उक्त नमुद गट अ, ब आणि क मधून शिक्षक / अधिकारी आणि गट ड व इ मधून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अर्ज आवश्यक सहपत्र तथा अभिप्रायासह **६ संचामध्ये** गोपनियरित्या मोहोरबंद लिफाफ्यात **कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ** यांचेकडे **३१ मार्च २०२३, दुपारी ५.०० वाजेपर्यंत** पाठवावयाचे आहेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे व अपूर्ण अर्ज कुठल्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

**महत्वाचे**

**प्रस्तुत अर्जासह विनियमातील परिच्छेद १० मध्ये दिलेल्या निकषाच्या पुष्ठ्यर्थ व इतर जी सहपत्रे जोडण्यात येतील त्या सर्वांना न चुकता अनुक्रमांक देऊन त्याची अनुक्रमणिका सहपत्रांच्या सुरूवातीस जोडण्यात यावी. सहपत्रांची पुस्तिका हाताळणीस सहज सुलभ असावी व जोडलेल्या अनुक्रमणिकेनुसार सदर सहपत्रे पताकांकित करून क्रमवार लावावी. यानुसार सदर प्रस्ताव नसल्यास ते स्विकृत होणार नाहीत व अशा आणि अपूर्ण प्रस्तावासंबंधी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.**

प्रस्तुत बाबीचे प्रयोजन हे विद्यापीठ शिक्षक, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्यक्षम सहयोगातून मिळणाऱ्या सेवेचा यथोचित गौरव व्हावा व या प्रेरणेतून आपल्या कामाच्या उत्तरदायित्वाची भावना वाढीस लागून कामकाजासंबंधी अधिक सकस, गुणवत्तापूर्ण व कार्यक्षम वातावरण निर्माण व्हावे या हेतूने, वरील सूचना आपल्या नियंत्रणाअंतर्गत शिक्षक/अधिकारी/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देऊन या गौरवपूर्ण उपक्रमात त्यांना सहभागी होण्यासाठी प्रेरीत करावे, ही विनंती.

(डॉ.तुषार आर.देशमुख)
कुलसचिव

प्रति : सर्व शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख/प्रशासकीय विभागांचे नियंत्रण अधिकारी, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ.